'A' Grade
NAAC Re-Accredied
(3rd Cycle)

॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥

# उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव-४२५००१

जावक क्रमांक : उमवि/८/पी-०२/६३२/२०१७ दि.३०.०८.२०१७

प्रति,
मेथर्ड इंजिनीअर्स,
नवजीवन मंगल कार्यालया शेजारी,
जयकिसन वाडी,
जळगाव.
पिन- 425001.

**विषय :- आपल्या फर्मचे नाव पुरवठादारांच्या काळ्या यादीत (Black List) समाविष्ट केल्याबाबत.**

संदर्भ :- विद्यापीठ खरेदी आदेश क्र.100003061, दि.26.04.2017

महोदय,

उपरोक्त संदर्भीय पत्रान्वये आपणास कळविण्यात येत की,मा.कुलगुरु महोदयांच्या निवासस्थानासाठी मायक्रोवेव्ह ओव्हन व वॉटर प्युरीफायर इ. आवश्यक साहित्याचा पुरवठा करण्यासाठी खरेदी आदेश निर्गमित करण्यात आलेला होता.

याबाबत संबंधित विभागाकडून प्राप्त झालेल्या अहवालानुसार, आपणाकडून गोदरेज कंपनीचे मायक्रोवेव्ह ओव्हन हे कंपनीद्वारा पॅकींग केलेल्या विहीत वेष्टनात प्राप्त झाले नसून वापरलेले मायक्रोवेव्ह ओव्हनचा पुरवठा केल्याचे निदर्शनास आले आहे. व डेमो देणाऱ्या प्रतिनिधीने देखील या बाबीस दुजोरा दिला आहे. सदर बाब ही गंभीर स्वरुपाची आहे. आपण विद्यापीठाची फसवणूक करण्याचा प्रयत्न केलेला आहे. त्यामुळे विद्यापीठ अधिकार मंडळाने घेतलेल्या निर्णयानुसार, **आपल्या फर्मचे नाव विद्यापीठ पुरवठादारांच्या काळ्या यादीत (Black List) समाविष्ट करण्यात येत आहे, याची नोंद घ्यावी.**

कळावे,

आपला विश्वासू,

(डॉ. बी.डी.कऱ्हाड)
**वित्त व लेखा अधिकारी**

प्रत माहितीस्तव :-
मा.कुलगुरु कार्यालय,उ.म.वि.,जळगाव